ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi Part - II | January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | भारतीय शेती समोरील आव्हाने<br>**डॉ. विश्वनाथ कोक्कर** | ११६-११७ |
| २७ | कृषीनिष्ठ जाणिवांचा मराठी काव्यातील वेध<br>**वाडेकर छाया किसनराव** | ११८-१२० |
| २८ | मराठी साहित्यामधील कृषीनिष्ठ जाणिवा<br>**डॉ. योगीता देवगिरीकर कथले** | १२१-१२२ |
| २९ | शेतकरी दीर्घकाव्यामधील कृषीनिष्ठ जाणिवा<br>**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे** | १२३-१२७ |
| ३० | शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कर्ज माफी<br>**प्रा. डॉ. शिवाजी भ. यादव** | १२८-१३१ |
| ३१ | रोहिणी कुलकर्णींच्या कादंबरीचा स्त्रीवादी भूमिकेतून अभ्यास<br>**प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे - काकडे** | १३२-१३७ |
| ३२ | ग्रामीण साहित्यातील नवांकुर: एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. रेखा कचरूजी मेश्राम** | १३८-१४० |
| ३३ | १९२०-१९६० या काळातील मराठी साहित्यातील कृषिनिष्ठ जाणीवा<br>**संतोष पांडुरंग सुरडकर** | १४१-१४४ |
| ३४ | संत तुकारामांच्या साहित्यातील कृषिनिष्ठ जाणिवा<br>**डॉ. संतोष शिवनाथ कानडे** | १४५-१४७ |
| ३५ | सदानंद देशमुख यांच्या साहित्यामधील कृषी जीवन<br>**प्रा. डॉ. एम. पी. खेडेकर** | १४८-१५१ |
| ३६ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शासकीय पॅकेज वरवरची मलमपट्टी<br>**प्रा. डॉ. संतोष तु. कुटे** | १५२-१५७ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३१. रोहिणी कुलकर्णींच्या कादंबरीचा स्त्रीवादी भूमिकेतून अभ्यास

प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे - काकडे
संत भगवानबाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा, जि. बुलढाणा.

**मराठीतील स्त्रीवाद**

पाश्चात्यांच्या विचारधारेमधून स्त्रीवादाचा विचार आपल्याकडे आला. पाश्चात्यांच्या प्रगत देशांमध्ये स्त्रियांच्या दर्जाच्या बाबतीत विचार अगोदर झाला. 'स्त्रीवाद' ही विचारप्रणाली १९७५ नंतरच्या दशकामध्ये महाराष्ट्रात पुढे आली. जगामध्ये बहुतेक ठिकाणी पुरुषप्रधान संस्कृती आहे. त्यामुळे पुरुष वर्गाने स्वतःच्या हितसंबंधांच्या अनुकूल बाबी स्वतःकडे घेतल्या. तसेच पुरुषी वर्चस्व स्वतःकडे घेतले आणि परंपरेने त्यांच्याकडे ते येतही गेले. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला जाचक निर्बंध घातले. अन्याय, यातना देऊन हरप्रकारे तिचे शोषण चालवले. १९ व्या शतकानंतर भारतामध्ये अनेक स्त्री-संघर्ष झाले आणि त्या संघर्षातून मंदगतीने का होत नाही स्त्रियांच्या विकासाची पाऊलवाट निर्माण झाली. या स्त्री संघर्षातूनच 'स्त्रीवादी' संकल्पनेचा शोध घेऊन मानवी इतिहासात जी स्त्रियांची दडपणूक झाली, या संस्कृतीत, समाजव्यवस्थेत मानवी संबंधाकडे व त्याच्या नीतीकडे पाहण्याची दृष्टी या विचारप्रणालीने दिली. पुरुषप्रधान समाजरचनेमध्ये स्त्रीच्या होणा-या शोषणाची, दडपणुकीची, दुय्यमत्वाची जाणीवही तिला होत नव्हती. आपण स्त्री आहोत म्हणजे हे जीवन आपल्या वाटयाला येणारच तसेच स्वतःवरचे शोषण, अन्याय, कुचंबणा, दिलेले दुय्यमत्व, चाकोरीबध्द जीवन हे स्त्रीने गृहीत धरुन सहज स्विकारले होते. १९७५ ला आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रियांच्या पाश्चात्य स्त्री चळवळीच्या वैचारिक अधिष्ठानांशी संबंध आला आणि तेथून आपल्याकडील स्त्री चळवळ स्त्रीवादी जाणीवेने कार्य करायला पुढे सरसावली.

या स्त्रीवादी विचारप्रणालीमुळे समाजामध्ये स्त्रीचे दुय्यम स्थान - पुरुषाची स्त्रीवरील वर्चस्वी भावना - स्त्रीचे समाजात 'माणूस' म्हणून नाकारले गेलेले जीवन, तिला लाभलेली पशुतुल्य वागणूक हे डोळसपणाने निदर्शनास यायला लागले. आधुनिक कालखंडामध्ये तिला आपल्यावर होणा-या अन्यायाची, शोषणाची तीव्रतेने जाणीव होऊ लागली. त्यामुळे ती पुरुषप्रधान संस्कृतीविरुध्द बंड करायला लागली. निसर्गतः लिंगभेदावर आधारित स्त्री-पुरुष हा भेद त्यांच्या शरीरानुसार करण्यात आला तरी 'बाईपणा', 'पुरुषीपणा' या संकल्पना समाजाने निर्माण केल्या. हया संकल्पना मोडीत काढण्याचा प्रयत्न स्त्रीवाद करतो. मालकी हक्क - संपत्ती - वारसा या क्रमात कुटूंबसंस्थेत स्त्रीला पुरुषाच्या ताब्यात ठेवण्यासाठी तिच्यावर मर्यादा - संस्कार - दडपणूक मूल्ये लादून, पुरुषी वर्चस्व व स्त्रीचे दुय्यमत्व घडत जाऊन तिला माणूस म्हणून

नाकारले गेले. त्यामुळे सर्व क्षेत्रात स्त्रीला समाजरचनेतील माणूस म्हणून स्थान प्राप्त होण्याकरीता सर्वच क्षेत्रात संघर्षशील राहणारी 'स्त्रीवाद' ही विचारप्रणाली आहे.

**अ) 'स्त्रीवाद' म्हणजे काय ?**

"स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेवून स्वतःचा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारुन तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करुन दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे. ज्यावेळी स्त्री ही खुलेपणाने श्वास घेवून पुरुषाइतकेच स्वतंत्र जीवन जगू शकेल त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही." अशी व्याख्या डॉ.अश्विनी धोंगडे या स्त्रीवादी विचारवंताने केलेली दिसून येते.

स्त्रीवादी ही पुरुषविरोधी विचारधारा नसून पुरुषी वर्चस्वाला नाकारुन स्त्रीला दिलेले दुय्यम स्थान व कनिष्ठत्वाची वागणूक नाकारुन 'माणूस' म्हणून तिच्याकडे बघणे तिला अपेक्षित आहे आणि तिला तिच्या हक्काकरीता निर्माण झालेले 'स्त्रीवाद' हे व्यासपीठ आहे.

अनेक स्त्रीवादी विचारवंत व अभ्यासकांच्या दृष्टिकोनातून निदर्शनास येते की, स्त्रीवाद हा एकांगी स्वरुपाचा नाही तर तो मानवतावादाचा एक घटक आहे आणि मानवतावादाच्या अनेक पैलूंशी तो जोडलेला आहे. स्त्री ही माणूस आहे. केवळ ती स्त्री आहे म्हणून तिची पिळवणूक केली जाते. तेंव्हा स्त्रियांनी व पुरुषांनी मिळून येथील समस्त स्त्रियांवर जो अन्याय होतो त्या अन्याय करणा-या व्यवस्थेविरुध्दचा संघर्ष अपेक्षित आहे. स्त्रियांना मानव म्हणून स्वतःच्या अस्तित्वाचे आत्मभान येणे स्त्रीवादाला अपेक्षित आहे. स्त्री ही बायकीपणातून व पुरुष हा पुरुषी साच्यातून मुक्त होऊन केवळ व्यक्ती म्हणून स्वतःला 'स्व' ओळखणे व माणूस म्हणून जगणे स्त्रीवादामध्ये अपेक्षित आहे.

**ब) स्त्रीवादी भूमिका**

स्त्रीवादी भुमिकेचा पुरुषी वर्चस्वालाच नव्हे तर वर्चस्वी भावनेलाच नकार आहे. पुरुषांचे वर्चस्व संपुष्टात येऊन स्त्रियांचे वर्चस्व प्रस्थापित व्हावे असे तिला वाटत नाही. एकूणच वर्चस्व भावनेतून मुक्त होऊन निर्मळपणे जीवनाकडे आणि साहित्याकडे पाहणे तिला अभिप्रेत आहे. पारंपारिक प्रतिमा नाकारुन व्यक्ती म्हणून स्त्रीचा शोध घेणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येते. ही जाणीव व्यक्त करण्याकरीता स्त्रीला नवी भाषा, नवे वाड्.मयसंबंधी यांचा शोध घ्यावा लागणार आहे. असा शोध काही प्रमाणात स्त्री लेखिकांच्या साहित्यातून बघायला मिळतो. स्त्रियांच्या वास्तवाचे संवेदन पुरुषकेंद्रीत भाषेत व्यक्त होऊ शकत नाही. याकरीता पुरुषी वर्चस्व पुसून त्यात स्त्रीचे संवेदन असणारी स्त्री विशिष्ट भाषाची येण्याची अपेक्षा येऊ घातली आहे.

स्त्रीच्या गुलामगिरीच्या पाठीमागे असणा-या पुरुषसत्ताक भूमिकांना नकार देणे हे स्त्रीवादाचे महत्वाचे अंग आहे. स्त्रीने घरापुरतीच आपली क्षमता ठेवू नये, स्त्रीवादी तत्वज्ञानाला स्त्रीतल्या माणूसपणाचा होणारा मृत्यू टाळावयाचा आहे.

भविष्याला आकार देण्यामध्ये तिचा क्रियाशील सहभाग असायला हवा. किंबहुना तिची अस्मिता हीच मनुष्यत्वाची अस्मिता आहे ही भूमिका स्त्रीवाद्यांना ठसठसीत मांडावयाची आहे.

**रोहिणी कुलकर्णीच्या कादंबरीतील स्त्रीवादी भूमिका**

१९६० नंतर मराठी साहित्यात वास्तवतेच्या अंगाने लेखन करणा-या लेखिका म्हणून रोहिणी कुलकर्णीचे नाव सुपरिचित आहे. त्यांनी आपल्या कथा आणि कादंबरी लेखनातून आधुनिक स्त्रीपुढे निर्माण होणा-या समस्यांचा परामर्श घेतला आहे. त्यांच्या कथेतून कुटूंबपध्दती, स्त्रीजीवन यांचे निरीक्षण नोंदविले आहे. प्रस्थापित लेखनापेक्षा वेगळया धाटणीचे लेखन करणा-या स्वतंत्र विचारसरणीच्या लेखिका म्हणून निश्चितच त्यांचे वेगळेपणा आहे. 'भेट' आणि 'फलश्रृती' या कादंब-याचा प्रातनिधीक स्वरुपात विचार करणार आहोत भेट. (१९८८)

या कादंबरीची मुख्य स्त्री व्यक्तिरेखा सुधा ही सुशिक्षित, कमावती, स्वतंत्र विचाराची स्वअस्तित्वाची जाणीव असणारी आहे. भाऊसाहेबांच्या घरात आपल्याला स्त्री स्वातंत्र्य मिळत नाही, आपली घुसमट होते हया जाणिवेने ती भाऊसाहेबांपासून फारकत घेऊन वेगळी होते. जसे आहे तसे न स्वीकारता परिस्थितीला शरण जात नाही. बंडखोर भूमिकेतून ठामपणे ती उभे राहते. आपल्या स्वतःच्या मनाप्रमाणे नव्याने सतीशबरोबर विवाह करते. सतीश हा नोकरी करणारा तिच्या सुख-दुःखात सहभागी होणारा आहे. सुधाच्या व्यक्तिस्वातंत्र्य, स्वःअस्तित्व, विचारस्वातंत्र्य जपणारा आहे.

सुधाला पहिल्या नव-यापासून झालेला एक मुलगा आनंदा भाऊसाहेबांजवळच आहे. फडक्यांची बाबीताई जेव्हा सुधाला सांगते की, कर्णिकांकडे आनंदा लग्नासाठी आलेला आहे, असे समजल्यावर ती अस्वस्थ होते. सतीशपासून तिला अपत्य असूनही ती आनंदाच्या भेटीसाठी तळमळते. मातृत्त्वाच्या ओढीमुळे आणि आईचे अपत्याशी असलेल्या नात्याने ती जोडली गेली आहे. 'स्व' बरोबरच ती आनंदाचाही विचार करते.

सुधाची आई म्हणजे, "तुम्ही बुकं वाचलेल्या, नव्या विचारसरणीच्या तुझ्या वाचनाचं केवढं कौतुक तुझ्या वडिलांना, पण ऐनवेळी विवेक राहतो का तुला ? बंधन तुटलं तरी आईपण आलं का तोडता ?" येथे लक्षात येते की, ती नवविचारसरणीची, शिकलेली आहे. पहिल्या नव-याचे सर्व पाश तोडून टाकते, परंतू तिचे आईपण तिला तोडता येत नाही.

एकदा अचानक इंदूरच्या बाजारात सुधाचा दिर पमा याच्याशी सुधाची भेट होते. सुधाला सर्वांचा विरोध असतानाही पमा सुधाच्या पाठीमागे खंबीर उभा राहतो आणि आनंदाची भेट घडवून आणतो. सुधाला ऑफिसच्या पत्त्यावर आनंदाचे पत्रे येते. आनंदी मोकळेपणाने सुधा आनंदाचे पत्र आल्याचे सतीशला सांगते. आनंदाला भेटण्याची इच्छा व्यक्त करते. सतीश सुधाला आनंदाला भेटण्यासाठी परवानगी देतो. भाऊसाहेबांच्या ठिकाणी असणारा पुरुषी अहंकार सतीशच्या ठिकाणी दिसत नाही. तिच्या मन, भावनांचा तो आदर करतो.

सुधा आनंदाला भेटायला येणार म्हणून घरात अनेक वाद निर्माण होतात. पमा हे आई-दादाच्या कानावर घालतो. सर्वच जण आनंदा सुधा भेटीला नकार देतात. आई थोडी वयाने मोठी असल्याने सर्वजण तिची कदर करतात. पण निर्णयप्रक्रियेत तिला कोणी घेत नाही. दादा, भाऊसाहेब ही सर्व पुरुषी अहंकारी मंडळी आहेत. त्यांच्यापुढे घरातील इतरांचे काही चालत नाही. या कादंबरीतील सर्वच स्त्रियांची या ना त्या कारणाने पुरुषांमागे फरपट झालेली दिसते. म्हणूनच तर सुधा या घरात राहू शकली नाही. परंतु पमाच्या सहकार्यातून ही मायलेकरांची भेट घडवून येते. या भेटीने भाऊसाहेबांच्या घरातील वातावरण पूर्ण ढवळून निघते.

सुधा घरी आल्यावर त्या ठिकाणी भाऊसाहेब आणि कमावहिनी येतात. ते सुधाचा उपमर्द करतात. परंतु शेवटी भाऊसाहेबांना राहवत नाही किंवा सुधावरील पहिल्या प्रेमाखातर म्हणा ते आनंदाला सुधाच्या भेटीसाठी पाठवितात आणि आईमुलांची भेट होते.

सुधाचे मातृत्व तिला स्वस्थ बसू देत नाही. येथे भारतीय संस्कृतीपेक्षाही मातृत्व प्रेम अधिक प्रखर आहे. सुधाही सुशिक्षित, नव्या जाणिवेची, कमावती स्त्री असली तरी आपले मातृहृदय बदलू शकत नाही. मातृप्रेमासाठी ती असुसलेली आहे. दुस-या संसारामध्ये एक मुलगी असूनही ती पहिल्या मुलाला आनंदाला विसरु शकत नाही.

'भेट' या कादंबरीमध्ये मातृत्व आणि आईचे अपत्याशी असलेले नाते स्पष्ट होते. एकत्र कुटूंबपध्दतीत स्त्रीच्या वाटयाला आलेले जिणे यावर लेखिका प्रकाश टाकते. सुधाने भाऊसाहेबांबरोबरची कायद्याने सर्व बंधने तोडली आहेत. परंतु आपले आईपणा तोडणे सुधाला अवघड जाते. बौध्दिक पातळीवर कितीही बदलायचे ठरविले तरी भावनिक पातळीवर बदलणे अवघड जाते. हे सुधा आणि भाऊसाहेबांच्या शेवटीच्या भेटीत दिसून येते. कायद्याने सर्वच प्रश्न सुटत नाहीत तर भावनेनेही प्रश्न सुटू शकतात हे लेखिका मांडते. एकत्र कुटूंबपध्दतीत स्त्रीची होणारी हेळसांड अशा अनेक प्रश्नांना 'भेट' या कादंबरीत उजाळा मिळतो.

**'फलश्रृती'**

रोहिणी कुलकर्णी यांची 'फलश्रृती' ही कादंबरी १९८८ साली प्रसिध्द झाली. आमन्ना एक संसारी स्त्री आहे. आपल्या कुटूंबाची घडी व्यवस्थित बसविण्यासाठी ती धडपडते आहे. आपल्या कुटूंबाची संपूर्ण जबाबदारी ती सांभाळते. आमन्ना आणि बाप्पांचे संपूर्ण कुटूंब सुशिक्षित आणि संस्कारित आहे. मुलांनी काहीतरी कामधंदा करावा म्हणून बाप्पा सतत आमन्नाच्या पाठीमागे लागतात. आमन्ना आपल्या मुलांसाठी उपासतपास, व्रतवैकल्य करणारी स्त्री आहे. बाप्पाला आमन्नाचे हे प्रयोग निरर्थक वाटतात. स्वतःच्या मनाची फसवणुक वाटते. बाप्पा तर म्हणतात, "माणसाचा स्वभाव हेच त्याच नशीब असतं." माणसाचं कर्तृत्व त्यांना महत्वाचे वाटते. देवधर्मापेक्षाही प्रयत्न श्रेष्ठ वाटतात. अर्थातच जगणे समृध्द करण्यासाठी भौतिक लक्ष केंद्रित करणे बाप्पांना महत्वाचे वाटते. हे उषा, सख्या, शानी, विमल, सदा ही त्यांची मुले आहेत.

दादा नोकरीनिमित्त बाहेरगावी आहेत. परंतु घरातील सर्व लोकांची काळजी घेणारे आहेत. सदाची बायको देवकी आत्महत्या करते. तेव्हा सदाला सावरण्याचे काम दादा करतात. बाप्पांनाही धीर देतात. आपल्या बायकोशी मैत्रीच्या नात्याने वागणारा स्त्रीपुरुष समानता मानणारा, घरात मुक्त वातावरण निर्माण करणारा दादा आहे.

शानी या कादंबरीतील ख-या अर्थाने आधुनिक पात्र आहे. ती सुशिक्षित आहे. एम.ए. पर्यंत तिचे शिक्षण झाले. नोकरी करणारी आहे. कामाच्या ठिकाणीच बिजवर्गीशी तिचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतात. परंतु घरी समजल्यानंतर, बाप्पा दुबे साहेबांकडून बिजावर्गींची बदली करतात. शानी अस्वस्थ होते. बिजवर्गीशिवाय लग्नाचा विचार करायला ती तयारनाही. स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागणारी आहे.

सदा हा आमन्नाचा शेवटचा आणि लाडका मुलगा. लाडात वाढलेला आहे. बाप्पाने अनेक प्रयत्न करुनही त्याला कामधंदा लागत नाही. म्हणून तो वैतागलेला आहे. एक दिवस रागाच्या भरात तो पळून जातो. मुंबईत गेल्यावर तो आमन्नाला पत्र पाठवितो. स्वतःचे अस्तित्व शोधण्यासाठी तो मुंबईला जातो. हरिमामा त्याला देशमुखांच्या येथे कामाला लावतात. देशमुखांच्या अपंग मुलीचे आणि सदाचे प्रेमसंबंध प्रस्थापित होतात. त्याला देवकीबरोबर लग्न करायचे आहे. देवकी पैसेवाल्याची मुलगी तर आहेत, परंतु ती अपंग असतानाही सदा तिच्याबरोबर लग्न करतो. त्याच्या लग्नास विरोध होतो. तरी तो लग्न करतो. आमन्ना आपल्या भावी सुनेसाठी कर्णफुले खरेदी करते. अपंग सुनेचा स्वीकार करते.

आमन्नाच्या सर्वच मुली विमल, उषा, शानी या संस्कारक्षम मुली आहेत. नीतीमूल्यांची कुठेही हेळसांड रोहिणी कुलकर्णीच्या व्यक्तिरेखेतून दिसत नाहीत. आमन्नाच्या कौटुंबिक जीवनात खूप संघर्ष होऊनही बाप्पांना मात्र ब-याच गोष्टींची माहिती नसते. आमन्ना वयाच्या मानाने या सर्व गोष्टी समर्थपणे हाताळतात. पूर्वीची पुरुषप्रधानता आता नष्ट होत चाललेली आहे. असेच रोहिणी कुलकर्णी आमन्नाच्या व्यक्तिरेखेतून वाचकांच्या मनावर बिंबवतात. घरातील निर्णय त्याच घेतात. स्त्रीकडे निर्णयक्षम काम सोपविले तर त्या समर्थपणे पेलतात हेच लेखिका दाखवून देते.

एक कर्तबगार स्त्री आमन्नाच्या व्यक्तिरेखेतून रोहिणी कुलकर्णी साकार करताना दिसतात.

एकत्र कुटूंबपध्दतीतील स्त्रीचे स्थान, स्त्री पुरुष समानता, सुशिक्षित व कमावत्या स्त्रीया कादंबरीतून दिसून येतात. संस्कारक्षम स्त्रीव्यक्तिरेखा दिसतात.

रोहिणी कुलकर्णी यांनी त्यांच्या 'भेट' हया कादंबरीतून मातृत्व आणि आईचे अपत्यांशी असलेले नाते अधोरेखीत केले आहे. स्त्रीला आलेल्या आत्मभानातूनच ती स्वतंत्र पध्दतीने जीवन जगू शकते. पारंपारिक व्यवस्थेविरुध्द बंड करुन उभी राहू शकते हा आधुनिकतेचा विचार त्यांची ही कादंबरी ध्वनित करते. एकत्र कुटूंब पध्दतीत वाटयाला आलेल जिणे लेखिका या कादंबरीत अधोरेखित करते. कायद्याने विवाहसंस्थेची सर्व बंधने तोडता येतात. पण आईपण तोडणे कसे अवघड आहे हा वेगळा विचारही लेखिका कादंबरीत मांडतात. बुध्दी आणि भावना यातील संघर्ष लेखिका चित्रित करतात. स्त्रीकडे व्यक्ती, माणूस म्हणून पहावे हा विचारही त्या मांडतात. जीवनात निर्माण होणा-या अनेक नव्या व जटिल प्रश्नांना जन्म देणारी ही कादंबरी आहे. जगण्याच्या नव्या वाटा लेखिका शोधते. 'फलश्रृती' या कादंबरीतून लेखिका नव्या -

जुन्यातील संघर्ष आधुनिकतेच्या अंगाने स्पष्ट करतात. आमन्नाच्या व्यक्तिरेखेतून आईचे आणि अपत्यांचे नातं लेखिका अधोरेखित करतात. एकत्र कुटूंबपध्दतीत आज स्त्रीचे काय स्थान आहे याची जाणीव ही कादंबरी करुन देते. सभोवतालच्या सामाजिक पर्यावरणात स्त्रीचे स्थान आणि समाजात होणारे बदल लेखिका टिपते. जे प्रश्न बुध्दीने सुटत नाहीत ते प्रश्न भावनेने सुटू शकतात. हा विचारही लेखिका देऊन जाते. उदा. आमन्ना कुटूंबाची घडी सुव्यवस्थित बसविण्यासाठी व्रतवैकल्ये, उपासतपास करतात. गुरुचरित्राचे पारायण करतात. या कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखा या सुशिक्षित आणि नोकरी करणा-या, संस्कारक्षम आहेत.